# दिनांक 14/04/2025

**1.** मांडवा (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/04/2025 रोजी 23:15 वा च्या सुमारास मौजे नवखार गावात हनुमान जयंतीचा पालखीचा कार्यक्रम संपुन घरी जात असताना आरोपीत रा.नवखार ता.अलिबाग हे पुर्व वैमनस्यातुन एकत्रीत येवुन फिर्यादी यांना तुम्ही पालखी लवकर का देवळात आणलीत आम्हाला अदयाप नाचायचे होते. असे बोलल्याने फिर्यादी रा.नवखार, अलिबाग यांनी आरोपीत यांना सांगितले कि आम्हांला पोलीस ठाण्यातुन पालखी कार्यक्रम लवकर संपवणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत असे बोलले असता आरोपीत क्र. 1 याने फिर्यादी यांचा भाउ यास हाताने तोंडावर फाईट मारून दुखापत केली तसेच फिर्यादी व इतर गावातील लोक भांडणे सोडविणेकरीता गेले असता त्यांना सुध्दा शिवीगाळी केली व साक्षीदार यांना लाथ मारून दुखापत केली तसेच मा. जिल्हादंडाधिकारी सो रायगड अलिबाग यांचेकडील जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

याबाबत मांडवा (सागरी)पोलीस ठाणे गुरनं. 44/2025, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 37(3) (1), भारतीय न्याय संहिता 2023 118(1), 352, 351(2), 190, 191(2) 191(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सुधीर पवार हे करीत आहेत.

**2.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/04/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे शेलु गावचे हद्दीत कर्जत बदलापुर रोड लगत गोकुळ धाम सोसायटीचे आवारात पार्कींग मध्ये ता.कर्जत येथे आज्ञात आरोपीत याने त्याचे ताब्यातील वॅगन आर कार क्र.एम.एच.04 जे.एम.7346 हि गोकुळधाम सोसायटीचे पार्कींग म्हधुन गाडी काढुन भरधाव वेगाने हयगयीने,अविचाराणे,निषकाळजीपणे चालवुन गोकुळधाम सोसायटीचे पार्कींग मध्ये खेळत असणरी फिर्यादी यांची मुलगी कु. भुमिका कानसिंग राजपुत हिस समोर ठोकर मारुन गाडीचे पुढील चाक तिच्या उजव्या पायावरुन जावुन पायास लहाण माठया गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.60/2025 भा.दं.वि.क. 281 , 125(a),125(b), मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/ सुरेश मोरे हे करीत आहेत.

**3.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/03/2025 रोजी 16:00 वा ते दि. 17/03/2025 रोजी 16:00 वा च्या दरम्यान माणगाव येथे ऑनलाइन पदध्दतीने, माणगाव येथे फिर्यादी यांचे कपडयाचे दुकान असुन ते त्याचे कपडयाचे व्यवसाया करिता ऑनलाईन होलसेल दुकाना

संबधित माहिती घेत असताना त्यांना व्हॉटसप क्रमांक वरून आरोपीत महिलेने तिच्याकडे स्वस्तात कपडे मिळतील याचे आश्वासन देवुन व्हॉटसअपदवारे आरोपीत हिने तिचेकडील बिल पावती, व्हिजीटींग कार्ड, कपडयाचे फोटो बनवुन फिर्यादी यांचेकडुन 1,61,650/- रुपये रक्क्म ऑनलाईन पेंमेटदवारे स्विकारून फिर्यादी यांनी मागणी केल्याप्रमाणे माल न देता फिर्यादी यांची ऑनलाईनव्दारे अर्थिक फसवणुक केली.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.81/2025 भा.दं.वि.क. 318 , 318 *4), माहिती तंत्रज्ञान अधि 2000 चे कलम 66 ःडी) 66 d प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि श्री निवृत्ती बो-हाडे हे करीत आहेत.

**4.** मांडवा (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/04/2025 रोजी 23:15 वा च्या सुमारास मौजे रांजणखार डावली नवखार, अलिबाग येथे मौजे नवखार गावात हनुमान जयंती पालखीचा कार्यक्रम चालु असताना सदरची पालखी साक्षीदार यांचे घराजवळ आली असता महिला फिर्यादी रा.रांजणखार डावली नवखार, अलिबाग व त्यांच्या घरातील इतर माणसे पुजा करण्यासाठी जात असताना पालखी सोबत असणारे आरोपीत यांनी पालखीची पुजा करण्यासाठी न थांबवता पुढे घेवुन गेले म्हणुन त्यांना विचारले कि, आम्हाला पुजा करायची आहे असे विचारताचं पुर्व वैमनस्याचा वादाचा मनात राग धरून आरोपीत यांनी शिवीगाळी करून आरोपीत क्र 03 रा.रांजणखार डावली नवखार यांनी महिला फिर्यादी यांचे पती यांच्या डोक्यात लोखं्डी रॉडने मारून दुखापत केली तसेच फिर्यादी व त्यांचे नातेवाईक भांडण सोडविण्यास गेले असता आरोपीत क्र 01 व 04 यांनी शिवीगाळी केली तसेच मा.जिल्हादंडाधिकारी सो., रायगड अलिबाग यांचेकडील जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

याबाबत मांडवा (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 45/2025, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 37(1) (3), भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1), 352,351(2), 190, 191(2),191(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सुधीर पाटील हे करीत आहेत.

**5.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/04/2025 रोजी 20:30 वा ते दि. 13/04/2025 रोजी 20:30 वा दरम्यान मौजे युनीमाउँट बिल्डीग विंग -सी चे पार्किगमध्ये खोपोली, ता.खालापुर येथे होंडा कंपनीची युनिकाँन मोटार सायकल क्र एम.एच 46 सीटी 2140,एकूण 50000/- रुपये व कंपनीची, युनिकाँन मोटार सायकल क्र. एम.एच 06सीई 5438 एकूण 30000/- रुपये व किंमतीच्या मोटार सायकली कोणत्यातरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे रा.युनीमाउँट बिल्डीग विंग -सी, रुम नं.107,खोपोली ता.खालापुर संमती शिवाय लबाडीचे हेतुने स्वतःचे फायदया करीता चोरुन नेले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.102/2025, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/प्रवीण भालेराव हे करीत आहेत.

**6.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/04/2025 रोजी 18:00 वा ते दि. 13/04/2025

रोजी 18:00 वा च्या दरम्यान मौजे वेश्वी ग्रामपंचायत हद्दीतील स्मशाणा समोरील घरामधुन ता.अलिबाग, येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घरामध्ये ठेवलेले 1,25000/- रुपये किंमतीचे फोर व्हिलर गाडयाचे स्पेअर पार्ट व 1,06000/-रुपये रोख रक्कम घरफोडी चोरी करुन चोरून नेली आहे.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.65/2025, भारतीय न्याय संहिता 2023 कलम 305(c),331(3), 331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास श्रेणी पोसई श्री प्रतिक पाटील हे करीत आहेत.

**7.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/04/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे रामाची आळी रावे येथे आरोपीताचे घरासमोर, पेण येथे फिर्यादी रा. रामाची आळी साई मंदीराजवळ रावे, पेण हे मोबाईल वर टाईमपास करित असताना आरोपीत नंबर 1 हा मोठया मोठयाने शिवागाळी करण्याचा आवाज आला म्हणुन फिर्यादी यांनी बाहेर जावुन पाहीले असता आरोपी नंबर 1 फिर्यादी यांची आई यांना लाकडी काठी व कपडे धुवण्याचा धोपटना घेवुन मारहाण करित होते. आरोपी क्रमांक 3 यांने फिर्यादी यांची आईस मारहाण केली. फिर्यादी यांनी तेथे जावून प्रतिकार केली असता आरोपी नंबर 2,3 व 4 यांनी फिर्यादीस हाताबुक्यांनी मारहाण केली त्या वेळी फिर्यादीचा भाउ हा भांडण सोडविण्यास आला असता त्यालाही आरोपी नंबर 2,3 व 4 यांनी शिवीगाळी करून हाताबुक्यानी मारहाण करून पुन्हा मारण्याची धमकी दिली.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.16/2025, भारतीय न्याय संहीता 118(1), 115(2), 352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री अशोक अढागळे हे करीत आहेत.

**8.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/04/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास महिला फिर्यादी यांच्या मुली पिडित क्र.1 व 2 या बिल्डींग चे टेरीसवर कडधान्य सुकविण्याकरीता करीता टाकलेले होते. त्याची राखण करण्याकरीता दोघी गेल्या असता आरोपीत हा येथील टेरीसवर येवुन पिडीत मुली क्र.1 व 2 यांना जाणीपुर्वक आरोपीत याने अश्लील क्रुत्य केले व मनाला लज्जा उत्पन्न केली.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.71/2025, बाल लै. अत्या. संरक्षण (POCSO)अधिनियम, 2012 चे कलम 12, भारतीय न्याय संहिता 2023 79 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्रीसल्मान खतीब हे करीत आहेत.

**9.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/04/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे रामाची आळी रावे येथे फिर्यादीचे घरासमोर, पेण, येथे महिला फिर्यादी रा. रामाची आळी साई मंदीर जवळ रावे, पेण यांचे पती हे मित्रासांबत गप्पागोष्टी करित असताना फिर्यादी यांचे गावातील आरोपी नंबर 1 ते 4 यांनी मागील भांडणाचा मनात राग धरून फिर्यादी यांचे यांना प्रथम शिवागाळी दमदाटी व भांडण करून आरोपीत नंबर 3 याने डोक्यात लोखंडी रॉडने व

आरोपीत नंबर 2 याने लाकडी काठीने उपट मारून डोक्यास दुखापत केली. तसेच फिर्यादी यांचे चुलत सासरे हे भांडण सोडविण्याकरिता आले असता त्यांना देखिल आरोपीत नंबर 2 यांने लाकडी काठीने उपट मारून डोक्यास दुखापत केली.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.17/2025, भारतीस न्याय संहिता कलम 118(1),115(2),352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री अशोक अढागळे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 13.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 269 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,59,900/-रुपये इतका दंड आकारला आहे.